## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये आदेश

जा.क्र.उपनि/वसई/बी.१/स्टापॅलेस हौ./क.७७(अ)/ /१८

उपनिबंधक सहकारी संस्था वसई तालुका यांचे कार्यालय

तामतलाव, जॉनी क्रॉस गल्ली, ता. वसई, जि. पालघर

दिनांक : /०२/२०१८

वाचले :- १) श्री. सुनील एम. लाहोटे यांचेकडील दिनांक १७/११/२०१७ रोजीचे तक्रार अर्ज.

२) या कार्यालयाकडील जा.क्र.३२१९/२०१७दिनांक १७/११/२०१७ रोजीचे पत्र.

३) स्टार पॅलेस को.ऑप.हौसिंग सोसा.लि.फिलीप्स कॉम्प्लेक्स,बाभोळा,वसई (प) ता.वसई जि.पालघर संस्थेकडील दिनांक २९/११/२०१७ रोजीचे पत्र.

४) या कार्यालयाकडील महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ मधील कारणे दाखवा नोटीस दि. १८/०१/२०१८

५) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) मधील तरतुद.

ज्याअर्थी, स्टार पॅलेस को.ऑप.हौसिंग सोसा.लि.फिलीप्स कॉम्प्लेक्स,बाभोळा,वसई (प) ता.वसई जि.पालघर ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ नुसार नोंदणीकृत सर्वसाधारण संस्था असून ती या कार्यालयाच्या अधिकार कक्षेत येते. आणि,

ज्याअर्थी, संस्थेचे सभासद श्री. सुनील एम. लाहोटे, सदनिका क्र.२०१ यांनी वाचावे क्र. १ नूसार या कार्यालयात तक्रार दाखल केली होती. त्याअनुषंगाने उक्त वाचावे क्र.२ नूसार संस्थेस तक्रारीतील मुद्यांवर खुलासा सादर करण्यासाठी कळविण्यात आले होते. संस्थेने याबाबत संदर्भ क्रमांक ३ अन्वये खुलासा सादर केला आहे.आणि,

ज्याअर्थी संस्थेवर सद्यस्थितीत अवैद्य समिती कार्यरत आहे त्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) अन्वये संस्थेचे दैनदिन कामकाज चालविणेसाठी प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती का करण्यांत येवू नये? याचा खुलासा या कार्यालयास प्रत्यक्ष दि. ०८/०२/२०१८ रोजी उपस्थित राहून करावा असे कळविण्यात आले होते व त्यास अनुसरुन दि. ०८/०२/२०१७ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी संस्थेच्यावतीने उपस्थित संस्था पदाधिकारी यांनी सद्याची व्यवस्थापक कमिटीची निवड दि. ०१/१०/२०१७ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत करण्यात आली आहे असे म्हणणे मांडले.सहकारी संस्थांचे निवडणूकीचे अनुषंगाने राज्य स्तरावर, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य,पुणे या प्राधिकरणाची स्थापना झाली असून व्यवस्थापक समितीची मुदत संपलेल्या सहकारी संस्थाच्या निवडणूका हया राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांच्यामार्फत घेणे आवश्यक आहे.आणि,

त्याअर्थी, सभासदांच्या व्यापक हिताचा दृष्टीकोन ठेवनू संस्थेवर प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणे क्रमप्राप्त असल्याचे माझे स्पष्ट मत झाले आहे. नोटीस प्रसिध्द करुन आक्षेप मागविणे तसेच संघीय संस्थेचे मत विचारार्थ घेणे आवश्यक नसल्याने संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहण्याकरिता प्राधिकृत अधिका-याची नेमणूक करणे आवश्यक असल्याने खालिलप्रमाणे आदेश पारित करण्यांत येत आहे.

### :- आदेश -:

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ)(१)ब(१) अन्वये प्राप्त अधिकारानूसार मी, डॉ.अशोक कुंभार, उप निबंधक, सहकारी संस्था,वसई, स्टार पॅलेस को.ऑप.हौसिंग सोसा.लि.फिलीप्स कॉम्प्लेक्स,बाभोळा,वसई (प) ता.वसई जि.पालघर या संस्थेवर श्रीमती ज्योती विनोद कोळी-अध्यक्ष, श्री.व्ही.यू.रेजी-सदस्य, श्री.कुमार तेवर-सदस्य,श्रीमती टेरेझा फ्रान्सिस-सदस्य यांची प्राधिकृत अधिकारी मंडळ नियुक्त करीत आहे.

Scanned by CamScanner

प्राधिकृत अधिकारी मंडळ यांनी संस्थेच्या दप्तराचा व मालमत्तेचा व दावायोग्य कागदपत्रांचा संपूर्ण पदभार घेवून तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.तसेच संस्था संचालक मंडळाचे निवडणूकीचे अनुषंगाने सभासदांची यादी विहित नमुन्यात तयार करुन या कार्यालयास सादर करावी.

प्रस्तुत आदेश आज दि. १६/०२/२०१८ रोजी माझे सही व शासन मुद्रेसह दिला असे.

( डॉ.अशोक कुभार )
उपनिबंधक,
सहकारी संस्था, वसई.

प्रति,

१. श्रीमती ज्योती विनोद कोळी-अध्यक्ष, श्री.व्ही.यू.रेजी-सदस्य, श्री.कुमार तेवर-सदस्य,श्रीमती टेरेझा फ्रान्सिस-सदस्य प्राधिकृत अधिकारी मंडळ स्टार पॅलेस को.ऑप.हौसिंग सोसा.लि.फिलीप्स कॉम्प्लेक्स,बाभोळा,वसई (प) ता.वसई जि.पालघर

२. अध्यक्ष/सचिव, स्टार पॅलेस को.ऑप.हौसिंग सोसा.लि.फिलीप्स कॉम्प्लेक्स,बाभोळा,वसई (प) ता.वसई जि.पालघर

२/- त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी संस्थेच्या दप्तराचा ,मालमत्तेचा व दाबायोग्य कागदपत्रांचा संपूर्ण ताबा प्राधिकृ अधिकारी यांना देवून तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३. शाखा व्यवस्थापक,ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. शाखा- वसई रोड

<u>प्रत माहितीसाठी सविनय सादर</u>

मा.जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,पालघर.

Scanned by CamScanner